लोकमत

# संशोधकांनी पेटंटवर अधिक भर द्यावा

## शिरपूर : राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी उमविचे अधिष्ठाता डॉ.डी.आर.पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** देशातील शास्त्रज्ञांनी पेटंट्सवर भर देऊन त्याबद्दल जागरुकता वाढवणे आवश्यक आहे. आपण केलेले संशोधनात्मक कार्य पेटंट करून संपूर्ण जगाला त्याचा उपयोग खुला करून देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांच्या अधिकाराचा (आयपीआर) अवलंब करावा, असे प्रतिपादन उमविचे विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ.डी.आर. पाटील केले.

शहरातील आर.सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठअंतर्गत बौद्धिक संपदा हक्कांचे अधिकार (आय.पी.आर.) या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. या परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राज्यभरातून तीनशेहून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

यावेळी उमविचे विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ.डी.आर. पाटील, प्राचार्य डॉ.एस.जे. सुराणा, उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर, प्राचार्य डॉ.एस.बी. बारी, जळगावचे डॉ.भूषण चौधरी, विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी वाशीमचे संचालक डॉ.एस.एस. तोष्णीवाल, औरंगाबाद येथील डॉ.एस.आर. शाही, डॉ.उल्हास पाटील आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.संजय सुराणा यांनी शिरपूर एज्युकेशन सोसायटी तसेच महाविद्यालयाची माहिती दिली. ते म्हणाले, महाविद्यालयाला २५ वर्षे पूर्ण झाली असून चालू शैक्षणिक वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. तसेच महाविद्यालयाचा प्रगतीचा आढावाही त्यांनी सादर केला. समाजाच्या सर्व विभागांमध्ये विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक यांच्या बौद्धिक संपत्तीचे फायदे याबाबत जनजागृती करणे व बौद्धिक संपदा जोपासणे याबद्दल विस्तृत माहिती दिली.

डॉ.एस.एस. तोष्णीवाल यांनी बौद्धिक संपदा हक्क, पॉईंट टू पॉवर या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी त्यांनी भारत देशाने जगाला दिलेल्या महत्त्वाच्या आविष्कारांची ओळख करून दिली व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. तसेच आपल्या देशात बौद्धिक संपदा हक्कांबद्दल वेळोवेळी झालेल्या बदलांची माहिती दिली.

डॉ.भूषण चौधरी यांनी आयपीआरचे ग्लोबल पातळीवरची प्रक्रिया व घडामोडीबद्दल सविस्तर माहिती दिली. संबंधित उपाययोजना करून बौद्धिक मालमत्ता निर्मिती व वाढ उत्तेजित करणे तसेच आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्यांशी सुसंगत असलेल्या आयपीआर अधिकारांशी संबंधित मजबूत आणि प्रभावी कायदे करणे गरजेचे आहे, असे ठामपणे सांगितले.

डॉ.एस.आर. शाही यांनी जागतिक बौद्धिक संपत्ती संघटनेबद्दल माहिती दिली. ही संघटना बौद्धिक मालमत्ता सेवा, धोरण, माहिती आणि सहकार्यासाठी एक जागतिक मंच आहे. संयुक्त राष्ट्राच्याद्वारे स्थापित एक संस्था असून त्यांचे ध्येय एक संतुलित आणि प्रभावी आंतरराष्ट्रीय बौद्धिक संपत्ती यंत्रणेच्या विकासाचे नेतृत्व करणे आहे, जे सर्वांच्या फायद्यासाठी नावीन्यपूर्ण आणि सर्जनशीलतेला सक्षम करते. या ठिकाणी बौध्दिक संपदा लिखाणाच्या बाबतीत इंग्रजी भाषेत मसुदाविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा.स्नेहल भावसार व डॉ.पद्मजा आगरकर तर आभार प्रदर्शन डॉ.सौरभ गणोरकर यांनी केले.